# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ४०-२३** **दिनांक:- ०६/०२/२०२३**

## Instagram वर वेगवेगळे अकाऊंट तयार करून अल्पवयीन मूलीला त्रास देणाऱ्या आरोपीचा शोध घेण्यात सायबर गुन्हे कक्षास यश.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत काशिमीरा पोलीस ठाणेचे हद्दीत राहणाऱ्या महिला नामे **XXXXX** शेख यांनी त्यांची मुलगी रीया (बदललेले नाव) हिस कोणीतरी अज्ञात इसमाने वेगवेगळे इन्स्टाग्राम आयडी तयार करुन त्रास देत असलेबाबत दिलेल्या तक्रारीवरून दिनांक ०३/०१/२०२३ रोजी काशिमीरा पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात इसमाविरुध्द गु.रजि.नं । ६३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३५४ (ड), पोक्सो ॲक्ट कलम १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर प्रकरणामध्ये इन्स्टाग्राम आयडीची माहिती घेवून सायबर गुन्हे कक्षाकडून तांत्रिक तपास व विश्लेषणाचे आधारे संशयित आरोपीचा मोबाईल क्रमांक प्राप्त करुन प्राप्त माहिती काशिमिरा पोलीस ठाणे यांना कळविण्यात आली.

अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी.

- अनोळखी इन्स्टाग्राम रिक्वेस्ट ॲक्सेप्ट करु नका. अशा रिक्वेस्ट प्राप्त होताच ब्लॉक करण्यात यावे.
- आपल्या आयडीचे टु फॅक्टर ऑथंटीफीकेशन करुन ठेवावे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनि स्वप्नील वाव्हळ, पोलीस अंमलदार १२०९२ प्रविण आव्हाड, मपोअं १३०८७ आमिना पठाण, म.सु.ब आकाश बोरसे यांनी पार पाडली आहे.

**----0000----**